# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक : ९३ ) वर्धा, शुक्रवार ता. ३ जुलई १९६४ ( मूल्य ५ न.पै.


**सूचना**

कागदाचा तुटवडा पडल्यामुळे ह्यापुढील काही अंक फुलस्केपमध्ये निघतील. त्याबद्दल वाचकांनी क्षमा करावी. ही विनंती.

ऑफिस बदलल्यामुळे मागील अंक पाठविण्यास दिरंगाई झाली त्याबद्दल आम्ही आपले क्षमाप्रार्थी आहोत.

व्यवस्थापक

विनोबांनी सांगितलेली–

# परंधाम आश्रमाची कथा

## भरत भेट



**पवनार येथील परंधाम आश्रमात भरतराम मंदिरांतील मूर्ति. १९४८ साली आश्रमाची शेती खोदत असतांना विनोबांच्या कुदळीला लागून ती वर आली होती.**

हे जे स्थान बनले आहे. ते १९३८ साली जमनालालजींनी बनविले आहे. पाहुणे आदि मंडळी येतात म्हणून चांगले दृश्य बघून त्यांनी हे ठिकाण शोधून काढले. परंतु १९३८ सालात कोणीच इकडे आले नाही. त्यावेळी मी आजारी पडलो. हवा पालट करण्यासाठी मी जावे अशी चर्चा सुरू झाली. बापूजींनी अनेक स्थळांचा निर्देश केला. परंतु मी त्याला संमती दिली नाही. आणि पवनारलाच आलो. पहिल्यांदाच मी येथें येत होतो. जमनालालजींना वाटले की आश्रमासाठी हे उपयुक्त ठिकाण आहे, तेव्हा पासून येथे आश्रमाची स्थापना झाली.

येथे ज्या मूर्ति ठेवल्या आहेत. त्या येथेच निघाल्या आहेत. इतिसकारांचे म्हणणे आहे की गुप्त साम्राज्य आणि वाकाटक साम्राज्याच्या काळातील ह्या मूर्ति आहेत. भारतभर प्रवासात माझ्या अवलोकनात ज्या मूर्ति आल्या त्यावरून मलाहि इतिहासकारांचा अंदाज बरोबर वाटतो. १३०० – १५०० वर्षांपूर्वीचा तो काळ आहे. त्या सर्व मूर्ति जमीनीत गडप झालेल्या होत्या.

त्यापैकी भरत–रामाच्या मूर्तीची ( भरत राम मंदिरात ) जी स्थापना आम्ही केली त्यामागे अेक इतिहास आहे. हे ठिकाण जेव्हा मी पसंत केले तेव्हा ही सर्व जमीन पडीत पडलेली होती. वाईट स्थितीत होती. कुदळीने खोदण्यास सुरुवात केली. तेव्हा माझ्या कुदळीला ती मूर्ति लागली. ही १९४८ सालची गोष्ट आहे.

त्यामागें अेक फार मोठा इतिहास आहे. तुम्ही 'गीता प्रवचने' पुस्तक वाचले असेल. १९३२ सालीं धुळयाच्या जेलमध्ये मी ती प्रवचने दिली आहेत. तेव्हा १२ व्या अध्यायात मी सगुण निर्गुण उपासनेची तुलना केली आहे. त्यासाठी दोन दृष्टांत दिले आहेत. अेक लक्ष्मणाचा आणि दुसरा भरताचा. लक्ष्मणाची सगुण उपासना होती तर भरताची निर्गुण उपासना होती.

लक्ष्मण रामाशिवाय क्षणभर राहू शकत नव्हता तर भरताला रामाचे आज्ञेनुसार काम करण्यातच रामाचा सहवास लाभत होता. भरताने अयोध्ये-पासून दोन मैलावर पर्णकुटी बांधून राज्य चालविले आणि तपश्चर्या केली. अेकाने जंगलात तपश्चर्या केली तर दुसऱ्याने राज्य चालवून तपश्चर्या केली. राम वनवासाहून अयोध्येला परत आले आहेत आणि भरत त्यांना भेटत आहे; दोघांहि तपस्वयांचे चेहरे दिसायला सारखे आहेत, दोघांना हातात हात घेतले आहेत आणि जंगलात जाऊन तपश्चर्या करूनआलेला कोण आणि राज्य चालवून तपश्चर्या केलेला कोण हे ओळखायला येत नाही. केवळ वयात थोडा फरक ह्यावरूनच कल्पना करायची; असे चित्र कोणी काढले तर ते किती बहारीचे होईल. असे मी १९३२ साली बोलला होतो. त्यावेळी हे आमचे ब्रम्हविद्यामंदीर पवनारचे स्थान नव्हते. आमचे व्याख्यान अैकण्यासाठी धुळे जेल मध्ये जमनालालजी आणि प्यारेलालजी पण होते. तेव्हा जमनालालजींच्या मनात आले की अशा तऱ्हेचे भरत राम मंदीर बनवायला पाहिजे. आणि योगायोग असा की १९४८ साली जी मूर्ति खोदतांना मिळाली ती हुबेहुब तशीच आहे. ईश्वराचा तो प्रसाद लाभच मी समजतो. भक्तांच्या जीवनांत ईश्वरी प्रसादाची अनेक उदाहरणं आपण ऐकतो.

त्याच व्याख्यानात बुद्ध धर्म संघाचा पण उल्लेख आला आहे. बोधगयेला आम्ही समन्वय आश्रमाची स्थापना केली तेथे विहीर खोदणे सुरू केले तर त्या विहिरीतहि भगवान बुद्धाची मूर्ति निघाली; फारच सुंदर आहे ती.

येथे जी संस्था चालत आहे ती अखिल भारत–ब्रम्हविद्यामंदीर आहे. त्यामध्ये मुख्यत: कन्याच आहेत. आणि काही पुरुष मंडळी आहेत. सुशिला हा सर्व बिहार प्रांताच्या कस्तुरबा गांधी स्मारक निधीचे काम पहात होती. कर्नाटक, गुजराथ, केरळ, तामिळनाड मधील मंडळी साधनेसाठी येथे आली आहेत. येथे शेतीत काम करतात छापखानाहि आहे. तेथे प्रवचन आदि छापल जातात. तेथेहि त्या काम करतात. त्याशिवाय गृहकृत्य, अध्ययन, अध्यापनाचे काम येथ चालते.

( क्रमश: चालू )

## कार्यकर्त्यासोबत विनोबांचे चिंतन

विनोबा– लोकांना आज कसली अडचण वाटते ? दानाची, मालकी हक्क विसर्जनाची व राजकीय क्षेत्रातील अडचणी समोर येतात. निवडणुकीमुळे लोकांचे आपसात पटत नाही. लोकात भांडण सुरू होते. राजकीय पुढाऱ्यांची फार शक्ति लाभेल असे नाही. पण त्यांच्या निवडणूकांचा त्रास झाला नाही तर लोकांची अडचण दूर होते.

बंग– ह्या भागात तुम्ही जास्त दिवस द्यावे. त्याने ग्रामदानी गावे स्थिर होऊन त्यांच्यात कार्यहि चांगले चालू होईल. तेव्हा आपण निर्माण कामाला वेग देण्यासाठी आणि नवीन संशोधनासाठी येथे काही दिवस थांबले पाहिजे.

श्री. अेकनाथ भगत:– चातुर्मासाचा काळ तरी येथे काढावा.

विनोबा– पहिल्या दोन वर्षात मी हे केले होते. पहिल्या वर्षी पवनारला चार महिने व नंतर दुसऱ्या वर्षी काशीला दोन महिने थांबलो होतो. नंतर चांडिलला हिवाळ्यात आजारी पडलो म्हणून दोन अडीच महिने थांबावे लागले. त्यामागे कल्पना ही आहे की गेलेली शक्ति भरून निघते. पावसाळ्यात आपल्यालाहि अडचणी येतात व लोकहि अडचणीत पडतात. मग वाटले चालतच रहावे.

बंग व बाबाजी– पण तुम्ही आता थांबले पाहिजे. मांडव्यानंतर पवनार आश्रमातहि तुम्हाला चक्कर आला होता.

### मागील ग्रामदानांना बलवान करीत पुढे चला

मनोहरजी दिवाण– तुम्ही व काही लोक आग लावा म्हणता व आग लावण्याचे काम करता. पण जी गावे होतात त्यांच्याकडे नंतर लक्ष न दिल्याने ते विझलेले दिवेच राहतात. आणि असे झाले तर ह्या सर्व कार्यक्रमाचे परिणाम शुन्यवत निघतील.

विनोबा– ह्या मुद्याकडे लक्ष गेले आहे. योजना आयोग, सरकार, जिल्हा परिषद, रचनात्मक संस्था, कार्यकर्ते ह्यांनी ह्या कामात पडावे मी स्वत:च हे काम करावे अशी काही माझ्याकडून कोणी अपेक्षा करीत नाही. तेव्हा इतरांनी लागावे कामाला.

मनोहरजी– ही आग लावणे नाही.

विनोबा– ग्रामदाने सबळ झाली नाहीत तोपर्यंत तो ग्रामदानेच नाहीत असा ह्यात मुद्दा आहे. ग्रामदान प्राप्ति आणि त्या ग्रामदानी गावात त्या विचाराला स्थैर्य आणणे ही कामे ग्रामदानी कार्यकर्त्यांची आहेत जयप्रकाशजीनी, व अन्य कार्यकर्त्यांनीहि हा विचार मान्य केला आहे. नंतर मग निर्माणाचे व विकासाचे काम मी आता सुचविल्याप्रमाणे त्या त्या मंडळींनी करावे.

गोविंदराव– संत तुकडोजी महाराज ह्या कामात बरेच लक्ष घालणार आहेत.

बंग –जुलैच्याशेवटच्या आठवड्यात ते फिरणार आहेत. त्यांना ज्या भागात फिरायचे आहे त्या भागातील लोकाशी त्यांनी संपर्क जोडला आहे.

विनोबा– तुकडोजी महाराज प्रॅक्टिकल आहेत. ह्या पेरणीच्या गर्दीत काम होणार नाही हे पाहून त्यांनी पुढचा वेळ दिला आहे. वर्धा जिल्ह्याला ते बरेच दिवस देतील.

देशपांडे – महाराजांनी जिल्हादानाचा विचार मांडला आहे. त्याचा गंभीरतेने विचार व्हावा. विनोबा म्हणाले की मी चाललो तर तुम्ही थोडीशी हालचाल करता. मी बसलो तर झोपाल. आम्हाला असे विचारायचे आहे. आम्ही धावलो तर तुम्ही विश्रांति द्याल कां ? त्यासाठी काही दिवस बसाल का.

विनोबा– पण हिंगणघाटवाल्यासोबत तारखा ठरल्या आहेत ना ?

बंग– त्यांच्या तारखा निश्चित झालेल्या नाहीत, आपण जेव्हा केव्हा जाल त्याअगोदर त्यांना पंधरा दिवसांची पूर्वसूचना हवी आहे. त्यामुळे त्यांना पूर्व तयारी करायला सुलभ जाईल. आम्ही जिल्हाभर फिरतो. ता. १२ जुलैला शिबिर घेऊन ता. १९ पर्यंत हिंगणघाट तालुक्यात ग्रामदान सप्ताहाचे काम करू. आपण तर ११ सप्टेंबर पर्यंत येथेच थांबून विश्रांती करावी. अशी आमची इच्छा आहे.

विनोबा–२१ जुलैला सभा करू आणि काय अनुभव आला तो अैकू व त्यावर विचार करून ठरवू. ह्या दिवसात माझी नजर साटोड्यावर राहील. ते झाले तर बाजूची खेडी होतील. गरज वाटल्यास ती मंडळी मला साटोड्याला बोलावू शकतात. मी काही कंपोडमध्येच राहण्याची कैद मानीत नाही. साटोडा झाले की सिताराम भाऊचा पत्र पाठवितो अनुराबाद झालें पाहिजे म्हणून. ते म्हणतात साटोडा झाले की अनुराबाद करू. कारण त्यांना पक्का विश्वास आहे की साटोडा काही होत नाही आणि त्यामुळे अनुराबादची पाळी येत नाही. सोनेगाव आगरगावची मंडळी अशीच म्हणत होती " अगोदर नागझरी होऊ द्या त्यांच्यामागे आम्ही आहोच." त्यांनाहि असेच वाटत होते. पण नागझरी झाले आणि मग त्यांच्या पाठोपाठ जाण्याशिवाय आगरगाव सोनेगावला मार्गच उरला नाही. अनुराबाद हे मोठे गाव आहे. लोणी पेक्षाहि मोठ आहे. जळगाव (खानदेश) शहराच्या जवळ आहे.

नंदलाल-बाबा त्यासाठी तुम्हाला खानदेशात यावे लागेल.

विनोबा–"अरे ह्याच्या बोलण्यावरून ह्याचा भूगोल कळतो."

त्यानंतर महाराष्ट्रात पुढील कार्यक्रम आखण्याच्या दृष्टीने यवतमाळ, चांदा जिल्ह्याकडे चर्चा वळली.

विनोबा– मला चांदा व यवतमाळ वाले बोलावित आहेत. पण कोरडेच निमंत्रण आहे पांच पंचवीस ग्रामदाने घेऊन येतील तर त्यांच्या बोलाविण्यातील गांभीर्य कळेल. चांदा जिल्ह्याचे बाबत कळले नाही पण त्यांची तयारी चालली आहे असे अैकतो. तेथील जिल्हापरिषदेचे अध्यक्षच निमंत्रण द्यायला आले होते.

बंग– अकोला जिल्हा परिषदेचे अध्यक्षहि साहूंला आपल्याला भेटले होते आणि त्यांनी निमंत्रण दिलेले आहे.

विनोबा– हा चंदू काय म्हणतो ?

चंदुसिंग नाईक– अवितरित जमीन वाटून झाली आहे. सरकारने ज्या तीस-हजार अेकर जमीनीचे दानाचा संकल्प केला होता त्यापैकी त्यांनी किती वाटप केले ह्याचे आकडे तेथील कलेक्टर साहेब गोळा करीत आहेत. जूने काम अेका अर्थाने झाले. आम्ही १ लाख साडेचार-हजार अेकर जमीन मिळाल्याचे जाहीर केले होते. त्यापैकी ६१ हजार अेकर जमिनीचे संपूर्ण वाटप झाले आहे. सरकार ३० हजार अेकराबाबत कळविणार आहे आणि १३ हजार अेकर जी आश्वासनाची जमीन होती त्यापैकी ७-७॥ हजार जमिनीची दानपत्रें मिळाली पाच सहा हजारांची भेटायची आहेत. दात्यांच्या संमतीने आम्ही जमीन वाटतो दाते भेटत नाहीत म्हणून पुन्हा पुन्हा जावे लागते. काही दात्याच्या घरात पार्टीशन झाल्यामुळे काही अडचणी येतात ( क्रमश: )

संपादक :–श्री. गोपाळराव काळे, श्री वसंतराव बोंबटकर,
प्रकाशक:–श्री. वसंतराव बोंबटकर,
मुद्रक:–गो. भा. जोशी, भास्कर प्रेस, वर्धा.
स्वामित्व:–महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, मुंबई.

साम्ययोग दैनिक ता. ३ ७-६४ अ.९३ र.नं.ए.न.२९५
विनोबा वार्ता, मगनवाडी, वर्धा ( म. राज्य )

श्री. आचार्य विनोबाजी भावे
पवनार